# मेट्रो-३ची होणार आरे ते बीकेसीदरम्यान सुरक्षा चाचणी

मुंबई - कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाच्या आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्यादरम्यान मेट्रो डब्यात अवजड सामान भरून पहिल्यांदाच संपूर्ण क्षमतेने चालविण्यात येणार आहे. या चाचण्या आव्हानात्मक असणार आहेत. मेट्रो-३च्या चाचण्या पूर्ण झाल्यानंतरच रेल्वे सुरक्षा प्रमाणपत्र मिळणार असून, मे अखेरीस किंवा जून महिन्याच्या सुरुवातीलाच मेट्रो-३चे लोकार्पण करण्यात येणार आहे.

आरे कारशेडचे कामही मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येत असून, प्रोटोटाइप ट्रेनच्या माध्यमातून मेट्रो ट्रायल रन सुरू आहेत. आतापर्यंत आरे ते बीकेसी या मेट्रो-३च्या पहिल्या टप्प्यादरम्यान ९५ किमी प्रतितास वेगाची चाचणी घेण्यात येत होती. आता मात्र लोडेड ट्रायल्स सुरू करण्यात येत आहेत. लोडेड ट्रायल्सअंतर्गत ८ गाड्यांच्या ट्रेनचे प्रत्येक डबे ट्रेनच्या टन क्षमतेच्या आधारे दगडांनी भरलेल्या गोण्यांनी भरले जातील. गाड्या कार्यान्वित होण्यापूर्वी प्रवाशांचे वजन लक्षात घेऊन त्यांची कार्यप्रणाली निश्चित करण्यात येणार आहे. या लोड



करून मेट्रोच्या चाचण्या आठवड्याभरात सुरू होणार आहेत. या दरम्यान मेट्रो सातत्याने सुरू ठेवून सिग्नलिंग यंत्रणा, फेऱ्या, ट्रॅक, आवाज, घर्षण, वक्रता डब्यांची दोलायमान स्थिती या सर्व बाबींचा अभ्यास करण्यात येणार आहे. या चाचण्यांच्या अभ्यासामध्ये ट्रॅकवरील त्रुटींचा समावेश असून संशोधन, डिझाईन आणि सुरक्षा संस्थेचे अर्थात आरडीएसओ प्रमाणपत्र आणि मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त अर्थात सीएमआरएस यांच्याकडून मेट्रो-३ ची तपासणी करण्यात येत आहे.भारतात पहिल्यांदाच ८ गाड्या असलेल्या मेट्रो ट्रेनमध्ये ७५ टक्के क्षमता कार्यरत असून, इतर मेट्रो मार्गाची क्षमता ५० टक्के कार्यरत आहे. सध्या प्रकल्पाचे काम ९६ टक्के पूर्ण झाले असून, उर्वरित कामांमध्ये स्थानकांचे सुशोभीकरण, स्थानके आणि फलाटांवरील सुविधा यांचा समावेश आहे. एमएमआरसीएलच्या ताब्यात १९ रेक असून, पहिल्या टप्प्यासाठी त्या पुरेशा आहेत. पहिल्या टप्प्यादरम्यान २६० फेऱ्यांमधून १७ लाख दैनंदिन प्रवासी संख्या असणार आहे.